जनसंपर्क कक्ष

18 FEB 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांना अर्थसंकल्पात जेवढा वाटा तेवढे हक्क हवेत

## डॉ. विजय ककडे; विद्यापीठ स्त्री अभ्यास केंद्रातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांसाठी दहा टक्के तरतूद करण्यात आली आहे. परंतु, महिलांची लोकसंख्या ४९ टक्के आहे त्या प्रमाणात हा वाटा पुरेसा नाही. 'जेवढा वाटा तेवढा हक्क' असला पाहिजे, असे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'महिला : केंद्रीय अर्थसंकल्प २०२६' या कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'दिलासा' संस्थेच्या अध्यक्ष डॉ. रूपा शहा होत्या.

प्रा. ककडे म्हणाले, भारतामध्ये 'जेंडर बजेट' या संकल्पनेला २० वर्षे पूर्ण झाली असून, केंद्रीय अर्थसंकल्पात 'जेंडर बजेट स्टेटमेंट' दिले जाते; पण महिला उपक्रम, योजना या प्रातिनिधिक स्वरूपात न राहता महिलांचे मूळ प्रश्न सोडवले पाहिजेत.



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. विजय ककडे.

वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. केदार मारुलकर म्हणाले, 'स्वयंसेवी महिला उद्योजक' यांना केंद्रीय अंदाजपत्रकात महत्त्व दिले आहे. महिला उद्योजक यांच्यासाठी रिटेल आऊटलेटची तरतूद आहे.

डॉ. शहा म्हणाल्या, केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांसाठी याआधी केलेल्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन झाले तरच महिलांसाठी देण्यात आलेल्या 'बजेट'चा उद्देश साध्य होण्यास मदत होईल.

स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. राजेंद्र पारिजात व प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यश हेगडे-पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 FEB 2026



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# विचारांचा, ज्ञानाचा सन्मान!

**हिमयुगाच्या शेवटच्या कालखंडात एक महत्त्वाचा बदल झाला. शक्तीच्या सहाय्याने रक्षण करणारा टोळीप्रमुख बनत असे. मात्र, शक्ती हेच सर्वस्व नाही हे मानवाच्या लवकरच लक्षात आले. जो विचार करू शकतो, तोच टोळीला सुरक्षित ठेऊ शकतो हेही लक्षात आले. विचार करणे म्हणजेच चिंतन करणे, हे ज्ञान निर्मितीसाठी महत्त्वाचे असते.**

आजही 'वाचाल तर वाचाल' हे सुभाषित 'वाचन प्रेरणा दिन' आणि अन्य अनेक कार्यक्रमांमधून श्रोत्यांच्या कानावर पडत असते. मात्र, वाचन ही प्रक्रिया पुस्तक निर्मितीपूर्वीपासून सुरू होती. हे वाचन पंचनेंद्रियांच्या सहाय्याने होत असे. निसर्गाचे वाचनच सुरू होते. या वाचनातून मनात प्रश्न येऊ लागले. सुरुवातीपासूनच आकाशातील तारे पाहून ते का चमकतात, रात्रीच का दिसतात, ते इतक्या दूर कसे, झाडे वेगवेगळी का असतात, त्यांना फळे कशी लागतात, सगळ्याच फुलांची फळे का होत नाहीत, पाऊस कसा पडतो असे अनंत प्रश्न पडत. अर्थात, असे प्रश्न एखाद्यालाच पडत.

अर्थात, या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी एखाद्या टोळीतील एखादाच प्रयत्न करत असे, त्यामुळेच विचारवंतांची संख्या सुरुवातीपासूनच कमी आहे. अन्य लोकांची धारणा आजच्यासारखीच 'मला काय त्याचे' अशी असायची. त्या काळात पृथ्वीवरील शाकाहारी प्राणी आपले भक्ष्य आहेत आणि मांसाहारी प्राणी आपल्याला भक्ष्य बनवतात, अशी मानवाची धारणा होती. त्यातही हत्तीसारख्यां मोठ्या शाकाहारी प्राण्यांच्या वाटेला तो जात नसे. नाहीतरी हत्ती हा मानवाचा तसा पहिला गुरू. हत्ती एकटा सापडला तर वाघ, सिंह आकाराने लहान असूनही त्याची शिकार करत. मात्र, हत्ती टोळीत असताना, त्या टोळीकडे असे हिंस्त्र प्राणी वाकड्या नजरेने पाहण्याचे धाडस करत नसत. हे पाहूनच आदिमानवाने टोळी करून राहण्यास सुरुवात केली. अशा मानसिकतेतून मानवाने अनेक प्राण्यांना अंकित बनवले, त्यांना तो पाळू लागला. मात्र, याची सुरुवातही अपघाताने झाली.

हिमयुगाच्या अखेरच्या काळात कडाक्याची थंडी पडली होती. तोपर्यंत आपले पूर्वज गुहेमध्येच रहात असत. गुहेच्या दाराशी अग्नी प्रज्वलित करून ठेवलेला असे. त्याचे दोन फायदे मिळत होते. एकतर थंडी कमी जाणवत असे. थंडीपासून जीव वाचत असे आणि गुहेतील लोकांपर्यंत जंगलातील हिंस्त्र प्राणी जात नसत. मानव सोडून अन्य सर्व प्राणी अग्नीला भितात. ते अग्नीच्या आजूबाजूला जात नसत. अशीच एकदा कडाक्याची थंडी पडली होती. आदिमानवांची एक टोळी आफ्रिकेच्या मध्यभागी एका गुहेत रहात होती. त्या टोळीतील एक तरुण इतरांपेक्षा वेगळा वागत असे. इतर लोक प्राण्यांच्या पायाचे ठसे पाहून कोणता प्राणी असावा, केवळ याचाच अंदाज बांधत. हा तरुण मात्र तो ठसा किती खोल आहे, कोणत्या बाजूला ते ठसे धुसर होत गेले आहेत हे तपासत असे. यातून त्याला तो प्राणी कोणत्या दिशेला गेला, कधी गेला, याचा अंदाज येऊ लागला. हा तरुण शिकारीला जात नसे. कायम विचारात गुंग असे. इतर लोकही त्याला बरोबर घेत नसत. ते त्याला आजच्या भाषेत 'वाया गेलेला' समजत असत.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

एका रात्रीं कडाक्याची थंडी पडली होती. शिकारीला गेलेले इतर लोंक थकल्याने गुहेत झोपले होते. या तरुणाला मात्र झोप येत नव्हती. त्याने त्या दिवशी त्याच्या वाटणीचे मांसही खाल्ले नव्हते. तो आगीजवळ उब घेत विचार करत बसला होता. अचानक तेथे एक जंगली कुत्रा पळत आला आणि बसला. तो जंगली कुत्रा घाबरलेला होता. कदाचित त्याच्या मागे दुसरा कोणी प्राणी लागला असावा. तो भुकेलाही होता. तो तरुण त्याच्याकडे पाहून उठला. गुहेत गेला आणि आपल्या वाटणीचे मांस खात बसला. तो कुत्रा त्याच्याकडे आशाळभूतपणे पहात होता. त्या तरुणाला त्या कुत्र्याच्या डोळ्यात भूक दिसली. त्या तरुणाने स्वतःच्या वाट्यातील एक हाड त्या कुत्र्यासाठी दगडावर ठेवले. कुत्रा त्या तुकड्याजवळ जाऊन अंदाज घेऊ लागला. असे अन्न खाण्याची त्याला सवय नव्हती. वास घेऊन ते मांस खाण्यायोग्य आहे म्हटल्यावर त्याने ते हाड उचलले आणि शांतपणे चघळत भूक शांत करू लागला.

एक दिवस त्या तरुणाने अन्न दिले आणि त्या कुत्र्याने त्याच्याशी दोस्ती केली. तो कुत्रा आता रोज रात्री येत असे. तो तरुणही त्याला रोज अन्न देत असे. अखेर हे गुपित फुटले. यांची दोस्ती टोळीतील इतर लोकांच्या लक्षात आली. त्यांनी त्या तरुणाला विरोध केला. तो कुत्रा एक दिवस त्याच्या टोळीतील इतर प्राण्यांना घेऊन येईल आणि टोळीवर हल्ला करतील, अशी भिती त्यांना वाटत होती. मात्र, त्या तरुणाने कोणाचेच ऐकले नाही. कुत्र्याबरोबरची दोस्ती कायम ठेवली. अखेर नेहमीप्रमाणे इतरांनी त्याचा नाद सोडून दिला. आता तो तरुण काही वेळ कुत्र्याबरोबर घालवून झोपत असे. काही दिवसांनंतर त्या टोळीच्या ठिकाणाचा शोध लांडग्यांच्या टोळीला लागला. रात्रीच्या वेळी लांडग्यांच्या टोळीने गुहेवर हल्ला केला. तो तरुण जरी झोपला असला, तरी कुत्रा जागा होता. कुत्रा लांडग्यांचा सुगावा लागताच भुंकू लागला. तो कुत्रा अचानक भुंकू लागल्याने लांडगे भांबावले. त्यात गुहेच्या दरवाज्यात पेटलेली आग होती. लांडगे पळून गेले. मात्र, तोपर्यंत टोळीतील इतर लोक जागे झाले. बाहेर आल्यानंतर कुत्र्याने आपल्यावरील संकट टाळले हे त्यांच्या लक्षात आले. आता सर्वच लोक त्या कुत्र्याला सांभाळू लागले. कुत्रा हा पहिला प्राणी जो माणसाने पाळला. अशा रितीने अपघाताने जवळ आलेला प्राणी माणसाचे आयुष्य बदलू लागला. पुढे असेच एक कोकरू टोळीच्या जवळ आले. त्याला टोळी कापणार होती, मात्र एका मुलीने त्याचे प्राण वाचवले आणि पहिली शेळी पाळली. माणूस जनावरे पाळू लागला. त्यांची लोकर, दूध आणि भाकड झाल्यावर मांसासाठी वापर सुरू झाला. तरीही शक्तीने टोळीचे रक्षण करणारा टोळीप्रमुख असायचा. एकदा त्या टोळीच्या गुहेच्या आजूबाजूला एका हिंस्त्र प्राण्याचे ठसे आढळून आले. तेव्हा त्याचा विचार करणाऱ्या तरुणाने तो प्राणी तेथून दूर गेला असल्याचे सांगितले, मात्र टोळीचा विश्वास बसला नाही. आठेक दिवस लोकांनी पहारा दिला, मात्र तो प्राणी काही आला नाही. तरुणाचे म्हणणे खरे ठरले. तेव्हापासून विचार करणाऱ्याला महत्त्व प्राप्त झाले. तो टोळीचा प्रमुख बनू लागला. हा विचाराचा नव्हे तर त्यामागील चिंतनाचा सन्मान होता. विचारातून ज्ञान, ज्ञानातून विज्ञान आणि विज्ञानातून तंत्रज्ञान प्रवासाची ही सुरुवात होती.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

1 8 FEB 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे ७११ निकाल जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी २ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १२ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. दिवसभरात २, तर आजअखेर ७११ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

18 FEB 2026

जनप्रवास

# हवामान बदल व लिंगभाव समानतेवर आधारित प्राथमिक प्रशिक्षण

कोल्हापूर : महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत माविम मार्फत राबविण्यात येत असलेल्या नवंतेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प, Gender Transformative Mechanism अंतर्गत माविम मित्र मंडळ यांच्याकरिता दि १७ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत हॉटेल कोहिनूर येथे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाकरीता आज जिल्ह्यातील ४० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रशिक्षणचे उदघाटन डॉ. उत्तम सकट, Deputy Registar, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, शिरीष काटकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, कुंदन शिनगारे, वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी माविम यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. प्रशिक्षणमध्ये हवामान, हवामान बदल, हवामान बदलामुळे होणारे परिणाम आणि असुरक्षितता, वातावरण या विषयाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली.

18 FEB 2026

Times of India

# Shivaji varsity signs MoU with alumni entrepreneurs

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University's department of biotechnology has signed a Memorandum of Understanding (MoU) with five alumni entrepreneurs in order to provide opportunities for research, employment and training for the students.

These start-ups are located in the Pune, Kolhapur and Sangli. The agreement was signed in the university's hall of management council in the presence of the in-charge pro-vice-chancellor Jyoti Jadhav and registrar Dr Vilas Shinde.

"This was the first time that such an MoU was signed in the university, based on the concept of "My Students, My Researchers". Shivaji University will emerge as a centre for creating entrepreneurs rather than just a centre for awarding degrees. These companies, operating in cities like Kolhapur, Sangli and Pune, will boost research at the local level. This will strengthen the concept of "Learn and Earn" along with "Become an Entrepreneur while Learning"," Jadhav said.

Assistant professor Dr Sushama Patil, while talking to **TOI**, said, "This agreement will allow students to gain hands-on work experience in these companies."